पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ २२२ /२०१४
दिनांक – २८/०२/२०१४

प्रति,


मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक ०५/०३/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०५/०३/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १९**

दिनांक :- ०५/०३/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०५/०३/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड शहराच्या शासन निर्णय क्र.टीपीएस - १८९३/१२७६/सीआर-१७४/९३/युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास योजनेत व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले तसेच शासन निर्णय क्र.टीपीएस -१८०६/१४१/प्र.क्र.१९८६/२००९/नवि-१३, दिनांक २९ मे २०१० अन्वये फेरबदल प्रस्तावानुसार मंजूर विकास योजनेतील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन त्वरित करणे करीता संदर्भिय पत्रान्वये मा.नगरसदस्या यांनी कळविले आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३९४ | माध्यमिक शाळा | स.नं.२४५ पैकी, २४६ पैकी व २४७ पैकी | १००००.०० चौ.मी. |
| २ | आरक्षण क्र.३९६ | प्राथमिक शाळा | स.नं.२३१ पैकी. | २०००.०० चौ.मी. |

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ २२२ /२०१४
दिनांक - २८/०२/२०१४

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda19doc.